**ठळक बातम्या**

- राज्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघांमधे दुपारी १ वाजेपर्यंत सरासरी ३२ टक्क्याहून अधिक मतदान

- नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या मतदारसंघांतल्या ९७ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार

- तिसऱ्या टप्प्यातल्या राज्यातल्या ११ लोकसभा मतदारसंघात अर्ज भरण्याची मुदत संपली

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संध्याकाळी वर्ध्यात प्रचार सभा

<><><><><>

**राज्यातल्या** ५ लोकसभा मतदारसंघात दुपारी १ वाजेपर्यंत सरासरी ३२ पूर्णांक ३६ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक ४१ टक्के मतदान गडचिरोली-चिमूरमध्ये झालं. भंडारा-गोंदियात ३४ पूर्णांक ५६ शतांश टक्के, चंद्रपूरमध्ये सुमारे ३१ टक्के, नागपूरात २८ पूर्णांक ७५ शतांश टक्के, आणि रामटेकमध्ये २८ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान झालं.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रामटेकमध्ये ६२ पूर्णांक ७ शतांश, नागपूरमध्ये ५२ पूर्णांक ७ दशांश, भंडारा गोंदियात ६८ पूर्णांक ३१ शतांश, चंद्रपूरमध्ये ६४ पूर्णांक ६५ शतांश आणि गडचिरोली-चिमूरमध्ये सर्वाधिक ७१ पूर्णांक ९८ शतांश टक्के मतदान झालं होतं.

नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, विकास ठाकरे, सुनिल मेंढे, प्रशांत पडोळे, संजय कुंभलकर, नामदेव किरसान, राजू पारवे, चंद्रशेखर बावनकुळे, हंसराज अहिर, विजय वडेट्टीवार, सरसंघचालक मोहन भागवत, विलास मुत्तेमवार, धर्मरावबाबा आत्राम, डॉ.देवराव होळी, कृष्णा गजबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.

**गडचिरोली** शहरात नवमतदार, दिव्यांग, वृध्द मतदारांची मतदार रथामध्ये बसवून वाजत गाजत मिरवणूक काढून मतदान केंद्रापर्यंत नेण्यात आलं. खबरदारीचा उपाय म्हणून गडचिरोली जिल्ह्यातल्या सिरोंचा इथ पोलिसांनी हेलिकॉप्टरच्या सहाय्यानं ३ अतिरीक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पाठवली. वेळेवर बिघाड झाला तर ही मतदान यंत्र वापरण्यासाठी राखीव आहेत.

**भंडारा** जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातल्या खुशारी गावात श्रीहरी गायधने या वरानं लग्न करण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला. भंडारा जिल्ह्यात बेला इथल्या मतदान केंद्रावर उभारलेल्या सेल्फी पॉइंटवर मतदार गर्दी करत आहेत.

**रामटेक** तालुक्यातल्या कट्टा इथं एका मतदान केंद्र बांबू आणि वन आधारित संकल्पनेवर उभारलं आहे.  नागपुरात शंकर नगरातलं एक मतदान केंद्र वस्त्रोद्योग या थीमवर आधारित आहे. याठिकाणी हातमागाचं कापड आणि विविध कलाकृतीचं प्रदर्शन मांडलं आहे.

**चंद्रपुरात आणि गोंदियातही** एका वरानं लग्नापूर्वी मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><>**

राज्यातल्या नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत एकूण ९७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या

मतदारसंघात १० हजार ६५२ मतदान केंद्रं उभारली असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. या पहिल्या टप्प्यात राज्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह अनेक उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार आहे.

**<><><><><>**

रामटेकमध्ये सर्वाधिक २८, नागपुरात २६, भंडारा-गोंदियात १८, चंद्रपूरमध्ये १५ आणि गडचिरोली-चिमूरमध्ये १० उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक २ हजार ४०५ मतदान केंद्र रामटेकमध्ये, २ हजार १३३ भंडारा-गोंदियात, २ हजार ११८ चंद्रपूरमध्ये, २ हजार १०५ नागपूरमध्ये आणि १ हजार ८९१ मतदान केंद्र गडचिरोली-चिमूर मतदार संघात आहेत.

या ५ लोकसभा मतदारसंघात एकूण ९५ लाख ७० हजार ७१३ मतदार आहेत. त्यापैकी ९ हजार ४१६ मतदारांनी टपालाद्वारे तर ६ हजार ६३० जणांनी घरुन मतदानाचा पर्याय स्वीकारला आहे. सर्वाधिक २२ लाख २५ हजारांहून अधिक नागपूरमध्ये तर सर्वात कमी १६ लाख १९ हजारांहून अधिक गडचिरोली-चिमूरमध्ये आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागातर्फे आज सादर करण्यात येणार आहे. संध्याकाळी सव्वा आठ वाजता आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

तिसऱ्या टप्प्यातल्या १२ राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातल्या ९४ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरायची मुदत आज संपली. राज्यातल्या **रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले** या ११ मतदारसंघात या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात नारायण राणे, विनायक राऊत, सुनील तटकरे, अनंत गीते, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, प्रणिती शिंदे, उदयनराजे भोसले, छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखे प्रमुख उमेदवार या टप्प्यात उमेदवारी रिंगणात आहेत.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात आज नारायण राणे यांनी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह भाजपा आणि शिवसेनेचे अनेक नेते उपस्थित होते.

सांगलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी संजय राऊत, जयंत पाटील, काँग्रेस आमदार विक्रम सावंत, सुमन पाटील यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

लातूरमध्ये काँग्रेस उमेदवार शिवाजी काळगे यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी काँग्रेस नेते अमित देशमुख, धीरज देशमुख, चंद्रकांत हांडोरे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

**<><><><><>**

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते रघुनाथ पाटील यांनी काल भारतीय जवान किसान पार्टीच्या वतीनं उमेदवारी अर्ज दाखल केला. यामुळे या मतदारसंघात आता पंचरंगी लढतीचं चित्र आहे.

<><><><><>

यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने समनक जनता पक्षाचे उमेदवार अनिल राठोड यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

वंचितचे अधिकृत उमेदवार अभिजित राठोड यांचा उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाला होता.

<><><><><>

प्रधानमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज सायंकाळी वर्धा जिल्ह्यात तळेगाव इथं प्रचार सभा होणार आहे. महायुतीचे खासदार रामदास तडस तिसऱ्यांदा या मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. मोदी यांची उद्या २० एप्रिलला नांदेड आणि परभणी इथं प्रचारसभा होणार आहे.

<><><><><>

यंदा लोकसभा निवडणुकीसाठी राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये सेवेत असलेले युवा कर्मचारी मतदान केंद्राचं संपूर्ण नियंत्रण करणार आहेत. युवा कर्मचारी नियुक्त एकूण 450 मतदान केंद्रं राज्यभरात असणार आहेत. या युवा कर्मचाऱ्यांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेचं प्रशिक्षण देण्यात आलं आहे. युवा मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षीपासून निवडणूक आयोगानं नवीन उपक्रम राबवायला सुरवात केली आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वांत जास्त म्हणजे एकूण 36 मतदान केंद्रांचे नियंत्रण युवा कर्मचाऱ्यांकडे असणार आहे.

**<><><><><>**

मतदार यादीमध्ये नवीन नावांचा समावेश, मृत आणि इतरत्र स्थलांतरित झालेल्या मतदारांची नावं कमी करणं तसचं नाव किंवा छायाचित्रामध्ये दुरुस्ती करणं यासारखे बदल करण्याची प्रक्रिया ही सतत ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीनं सुरू असते. मात्र, पालघर जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं २४ एप्रिलला मतदार यादीत बदल करण्याची ही प्रक्रिया मतदानापर्यंत थांबवण्यात येणार आहे आणि त्यानंतरच मतदारांची अंतिम संख्या निश्चित होईल.

<><><><><>

मुंबई दक्षिण मध्यचे महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. लोकसभा निवडणुकीची रणनीती, १७ मे रोजीची महायुतीची सभा याबाबत राज ठाकरे यांनी सूचना दिल्याची माहिती राहुल शेवाळे यांनी दिली .

<><><><><>

अहमदनगरमध्ये, कंत्राटदाराकडून बिलाच्या १८ टक्के रक्कम लाच म्हणून घेताना जलसंपदा विभागातल्या दोन महिला अभियंत्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं पकडलं .सहायक अभियंता रुबीना शेख आणि कार्यकारी अभियंता रजनी पाटील अशी या महिला अधिकाऱ्यांची नावं आहेत.पहिला हप्ता म्हणून ६२ हजार रुपयांची लाच घेताना नगरच्या सहायक अभियंता आणि नाशिकच्या कार्यकारी अभियंता यांना लाच घेताना पकडलं. राहुरी तालुक्यातल्या कामासाठी ही लाच मागण्यात आली होती.

//<><><><><>//